**<u>ठळक बातम्या</u>**

- मुंबईत इंडिया मेरिटाईम वीक परिषदेचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते उद्घाटन
- भारताची संरक्षण निर्यात २३ हजार ५०० कोटी रुपयांच्या विक्रमी स्तरावर पोहोचल्याची संरक्षण मंत्र्यांची माहिती
- आंतरराष्ट्रीय सौर आघाडी सभेच्या आठव्या अधिवेशनाला आजपासून नवी दिल्लीत सुरुवात

**आणि**

- आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारत-बांग्लादेश दरम्यानचा सामना पावसामुळे अनिर्णित

**<><><><><>**

गेल्या दशकभरात सरकारने मेरिटाईम अर्थव्यवस्थेत केलेल्या धोरणात्मक सुधारणांमुळे आज भारत जगात मेरिटाईम क्षेत्रातला सशक्त देश म्हणून उभा असल्याचं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं आहे. शहा यांच्या हस्ते आज मुंबईत इंडिया मेरिटाईम वीक या परिषदेचं उद्घाटन झालं, तेव्हा ते बोलत होते. गेट वे ऑफ इंडिया सारख्या ऐतिहासिक वास्तू लाभलेल्या ठिकाणी होणाऱ्या मेरिटाईम वीक या परिषदेत गेट वे ऑफ वर्ल्ड दृष्टिकोनाविषयी विचारमंथन होणार असल्याचं ते म्हणाले.

**होल्ड बाईट - अमित शहा**

इंडिया मेरिटाईम वीक हा जगातल्या सर्वात प्रमुख सागरी मेळाव्यापैकी एक झाला असून त्यात ८५ देशांनी सहभाग घेतल्याचं केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यावळी म्हणाले. या परिषदेची यंदाची संकल्पना

एकत्रित महासागर, एक सागरी दृष्टीकोन अशी असल्याचंही ते म्हणाले. तर महाराष्ट्रातलं वाढवण हे बंदर जगातल्या सर्वोत्तम दहा बंदरांपैकी एक असेल, त्यामुळे भारताची सागरी शक्ती आणखी मजबूत होईल, असं महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले.

मुंबईत माझगाव गोदीत खोल समुद्रात मासेमारी करण्यासाठीच्या दोन नौकांचं लोकार्पणही शहा यांच्या हस्ते झालं. या नौकांची चावी आणि नोंदणी प्रमाणपत्रही यावेळी लाभार्थ्यांना वितरित करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्यासह शहा यांनी या नौकांची पाहणी केली. या नौकांमुळे मासेमारांना खोल समुद्रात जाऊन टूनासारखे मासे पकडणं शक्य होणार आहे.

या सोहळ्याला गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, ओदिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण मांझी, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल उपस्थित होते.

**<><><><><>**

भारताची संरक्षण निर्यात आता २३ हजार ५०० कोटी रुपयांच्या विक्रमी स्तरावर पोहोचल्याची माहिती संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी दिली आहे. नवी दिल्ली इथं झालेल्या एसआयडीएम वार्षिक परिषदेला ते आज संबोधित करत होते. गेल्या दशकात देशांतर्गत संरक्षण उत्पादन १ लाख ५० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त वाढलं  आहे. नाविन्य, संरचना आणि उत्पादन अशा तिन्ही बाबींवर भर दिल्याने ऑपरेशन सिंदूर यशस्वी ठरलं. स्वदेश निर्मित शस्त्रांस्त्रांमुळे भारताची प्रतिष्ठा आंतरराष्ट्रीय स्तरावर वाढल्याचंही सिंग यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

मलेशियातील क्वालालंपूर इथं २० व्या पूर्व आशिया शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी आज न्यूझिलंडचे प्रधानमंत्री क्रिस्तोफर लक्सन यांची भेट घेतली.  भारत आणि न्यूझिलंड दरम्यानचं द्विपक्षीय

सहकार्य वाढवण्याबाबतच्या लक्सन यांच्या वचनबद्धतेचं जयशंकर यांनी कौतुक केलं तसंच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वतीने लक्सन यांना शुभेच्छा दिल्या. जयशंकर यांनी अमेरिकेचे परराष्ट्र व्यवहार मंत्री मार्क रुबियो यांचीही भेट घेतली. परराष्ट्र व्यवहार मंत्री जयशंकर या परिषदेत भारताचं प्रतिनिधित्व करणार आहेत. या शिखर परिषदेत इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील शांतता, स्थिरता आणि समृद्धीसमोरील आव्हानांवर तसंच प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय घडामोडींवर विचार विनिमय करण्यात येणार आहे.

**<><><><>**

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल आज बेल्जियमची राजधानी ब्रुसेल्सला भेट देणार आहेत. ते दोन दिवसांच्या बेल्जियम दौऱ्यावर असून यावेळी ते युरोपियन महासंघाच्या व्यापारविषयक प्रधिकरणाचे उपाध्यक्ष मारोस सेफकोविक यांची भेट घेणार आहेत. युरोपियन महासंघाबरोबर भारताची मुक्त व्यापार करारा संदर्भातली चर्चा अंतिम टप्प्यात आलेली असताना होत असलेला गोयल यांचा दौऱा महत्त्वपूर्ण समजला जात आहे. भारत आणि युरोपियन महासंघ लवकरात लवकर काही ठोस, संतुलित आणि दोन्ही पक्षांच्या हिताच्या निर्णयावर येण्याच्या तयारीत आहेत. त्या दृष्टीनं या महिन्याच्या सुरुवातीलाच चर्चेची १४ वी फेरीही पार पडली असून उद्योगमत्र्यांच्या बेल्जियम दौऱ्यानं त्यात गती येण्याची शक्यता आहे.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि आसियान देशाच्या नेत्यांनी भारत आणि आसियान देशांबरोबरच्या परस्पर संबंधांवर चर्चा केली. प्रधानमंत्र्यांनी आसियान देशांनी स्वीकारलेल्या व्हिजन २०४५ बाबत त्यांची प्रशंसा केली. भारत - आसियान आर्थिक सहकार्यानं भारतीय लोकांचा फायदा होणार असून आसियानबरोबरचे संबंध अधिक दृढ होतील, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त येत्या ३१ तारखेला देशभरात रन फॉर युनिटी या दौडचं आयोजन करण्यात आलं आहे. या दौडमधे सहभागी होऊन वल्लभभाई पटेलांच्या विचारांचा सन्मान करावा, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जनतेला केलं आहे.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय सौर आघाडी सभेचं आठवं अधिवेशन आज नवी दिल्लीतल्या भारत मंडपम इथं सुरू होत आहे. या चार दिवसीय कार्यक्रमात १२४ देश सहभागी होत असून जगभरातील ४० हून अधिक मंत्री उपस्थित राहतील. जागतिक समुदायाने उज्ज्वल आणि शाश्वत भविष्यासाठी सौर ऊर्जा स्वीकारण्यासाठी हा कार्यक्रम महत्वाची भूमिका बजावेल. भारत हा जगातील तिसरा सर्वात मोठा सौर ऊर्जा उत्पादक देश आहे तसंच अक्षयऊर्जा वाढीसाठी जगातली दुसरी सर्वात मोठी बाजारपेठ आहे. प्रधानमंत्री सूर्य घर मोफत योजनेअंतर्गत देशातील २० लाखांहून अधिक कुटुंबांनी सौर ऊर्जेचा लाभ घेतला आहे.

**<><><><><>**

विकसित भारताचा मार्ग देशातल्या शहरातून आणि औद्योगिक केंद्रातून  नाही तर खेड्यांमधून जातो, असं अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. शेतकऱ्यांना नवउद्योजक बनवून, प्रत्येक जिल्ह्यात प्रक्रिया केंद्र सुरू करून, भारतानं केलेली प्रगती प्रत्येक घरापर्यंत पोहचवली तरच विकसित भारताचं स्वप्न पूर्ण होऊ शकतं, असं अर्थमंत्र्यांनी  समाज माध्यमावरल्या संदेशांत म्हटलं आहे.

**<><><><><>**

उपराष्ट्रपती सी.पी.राधाकृष्णन यांनी आज सेशल्सचे निवडून आलेल्या उपाध्यक्ष सबेस्टिन पिल्लई यांची भेट घेतली. या भेटीत दोन्ही देशांमधील परस्पर संबंध त्याचप्रमाणे समाईक संस्कृती, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि दोन्ही

देशांमधील नागरिकांमधल्या परस्पर संबंधांवर चर्चा झाल्याचं उपराष्ट्रपतींनी आपल्या समाजमाध्यमावरील पोस्ट मध्ये म्हटलं आहे. त्यांनी उपाध्यक्षांना त्यांच्या कारकिर्दीसाठी शुभेच्छाही दिल्या आहेत.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरची राजधानी जम्मू आणि श्रीनगरमधे आळीपाळीने हलवण्याची पद्धत पुन्हा एकदा सुरू करण्यात येत असून राजधानी जम्मूला हलवण्याच्या हालचालींना वेग आला आहे. जम्मूमधल्या रस्त्यांची दुरुस्ती, रंगरंगोटी करण्यात येत आहे. राजभवन मंत्रालय आदी ठिकाणच्या सुरक्षा व्यवस्थेत वाढ करण्यात आली आहे. तसंच जम्मू - श्रीनगर मार्गावर मोठ्या प्रमाणात पोलीस तैनात करण्यात आले आहेत.

**<><><><><>**

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी पुढील सरन्यायाधीश पदासाठी न्यायमूर्ती सुर्यकांत यांच्या नावाची शिफारस केली आहे. सरन्यायाधीश गवई येत्या २३ नोव्हेंबर रोजी सेवानिवृत्त होत असून त्यानंतर न्यायमूर्ती सुर्यकांत हे सरन्यायाधीशपदाची सूत्रं स्वीकारतील. या शिफारशीनंतर केंद्र सरकार त्यांच्या नावाची अधिसूचना जारी करेल. त्यानंतर न्यायमूर्ती सुर्यकांत २४ नोव्हेंबर रोजी सरन्यायाधीशपदाची शपथ घेतील. न्यायमूर्ती सुर्यकांत यांना १४ महिन्यांचा कालावधी मिळणार असून ते ९ फेब्रुवारी २०२७ रोजी सेवानिवृत्त होणार आहेत.

**<><><><><>**

छट पर्वाच्या तिसऱ्या दिवशी आज बिहारमध्ये लाखो भाविकांनी सुर्याला अर्ध्य दिलं. छट पर्वासाठी बिहारमध्ये गंगा, गडग, कोसी, महानंदा, बागमतीसह राज्यातल्या अनेक नद्यांवर विशेष छट घाट सजवण्यात आले आहेत. या निमित्तानं

गंगेच्या ७६ घाटांवर विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांनी देशवासीयांना छट पूजेच्या निमित्ताने शुभेच्छा दिल्या आहेत. भगवान सुर्य आणि छट मैया यांच्या पूजनानं निसर्गाच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी मिळत असते, असं राष्ट्रपतींनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. गृहमंत्री अमित शहा यांनीही देशवासीयांना छट पर्वाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी राज्यात छटपूजेनिमित्त सार्वजनिक सुटी जाहीर केली आहे.

**<><><><><>**

नागपूरमध्ये उद्या राज्यभरातील शेतकरी संघटना महाएल्गार आंदोलन करणार आहेत. शेतकऱ्यांची कर्जमुक्ती, शेतमालाला हमीभाव, दिव्यांगांना ६ हजार रुपये मानधन, तसंच मेंढपाळ आणि मच्छीमारांच्या हक्कांसाठी हे आंदोलन केलं जाणार असल्याचं प्रहार पक्षाचे नेते बच्चू कडू यांनी सांगितलं. जेष्ठ शेतकरी नेते विजय जावंधिया, राजू शेट्टी, अजित नवले, राजन क्षीरसागर, महादेव जानकर, वामनराव चटप यांच्यासह अनेक नेते या आंदोलनात सहभागी होणार आहेत.

**<><><><><>**

आयसीसी महिला विश्वचषक स्पर्धेत काल नवी मुंबईतील भारत-बांग्लादेश दरम्यानचा सामना पावसामुळं अखेर अनिर्णित राहिला. प्रथम फलंदाजी करणाऱ्या बांग्लादेशनं मर्यादित २७ षटकांमध्ये ९ बाद ११९ धावा केल्या. भारतीय महिलांनी नाबाद ५७ धावांपर्यंत मजल मारली असताना पाऊस थांबण्याचं चिन्ह नव्हतं, त्यामुळं सामना अनिर्णित ठेवावा लागला.

**//<><><><><>//**